## महाराष्ट्र शासन

# ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई- ४०० ०२३

**दुरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३ **फॅक्स क्र.** :- २२६४४६३८

**Website:**- www.dol.maharashtra.gov.in **E-mail:**- director.dol@maharashtra.gov.in


जा. क्र.३२/निविआ/२०१८-१९/२२०९-४६ दिनांक :- २३.०५.२०१८

**अनिवार्य खर्च** **ई-मेल / स्पीड पोस्ट**

**ग्रामपंचायत ग्रंथालये निधी वितरण आदेश क्र.२०१८-१९/०१**

प्रति,

**१) जिल्हा ग्रंथालय अधिकारी,**
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,
नांदेड/हिंगोली/अहमदनगर/जळगाव/नंदुरबार/
कोल्हापूर/पुणे/सांगली/सातारा/सोलापूर/ठाणे/रत्नागिरी/ रायगड/सिंधुदुर्ग.

**२) जिल्हा ग्रंथपाल,**
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,
चंद्रपूर.

**विषय** :- शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या सन -२०१७१८ मधील परिरक्षण अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित अनुदान अदा करण्यासाठी मासिक निधी वितरण प्रणालीमध्ये निधी वितरण.

**लेखाशिर्ष** :- मागणी क्र.डब्ल्यू-४,
२२०५, कला व संस्कृती
१०५ सार्वजनिक ग्रंथालये
(०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना
(०४) (०१) ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने **(२२०५११९६)** (अनिवार्य)
३१ सहाय्यक अनुदाने ( वेतनेतर )

**संदर्भ** :- १) संचालनालयाचे पत्र क्र.१४३९२-१४४३२, दिनांक १७.०३.२०१८
२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.मराग्रं-२५२७/(९१/१८)/साशि-५, दिनांक १९ मे, २०१८

**आदेश** :-

सन २०१८-१९ मध्ये शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी विषयांकित लेखाशिर्षांतर्गत रु.२,०९,८८,०००/- ( रुपये दोन कोटी नऊ लाख अठ्ठ्याऐंशी हजार फक्त ) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पित निधी खर्च करण्याची मर्यादा ७०% विहित करण्यात आली आहे. त्यानुसार याबाबत शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयानुसार '२२०५११९६' या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीच्या ७०% म्हणजे रु.१,४६,९०,०००/- ( रुपये एक कोटी सेहेचाळीस लाख नव्वद हजार फक्त ) इतका निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन मान्यता प्राप्त झालेली आहे.

वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये अनिवार्य खर्चाच्या योजनांसाठी अर्थसंकल्पीय निधीपैकी ९०% निधी BDS वर वितरीत करण्यात आल्याने सन २०१७-१८ मध्ये शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या नियमित परिरक्षण अनुदानाचा दुसरा

( कृ.मा.प.)

हप्ता पूर्णत: प्रदान करणे संचालनालयास शक्य झाले नाही. याबाबत विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांकडून संचालनालयाचे संदर्भ क्र.१ अन्वये माहिती प्राप्त करुन घेण्यात आली. प्राप्त माहितीनुसार सन २०१८-१९ मध्ये परिरक्षण अनुदानासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या अधीन राहून सन २०१७-१८ मधील परिरक्षण अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित अनुदान अदा करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हा निधी 'मागणी क्र.डब्ल्यू-४, २२०५, कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना, (०४) (०१) ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने ( २२०५ ११९६ ) ( अनिवार्य ) ३१ सहाय्यक अनुदाने ( वेतनेतर )' या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा व सदर खर्च वितरीत निधीच्या मर्यादेत ठेवावा.

जिल्ह्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना नियमानुसार अनुदान वितरणाची कार्यवाही वेळेत करण्यात यावी. सहाय्यक अनुदानाचे देयक कोषागारात सादर करतांना आहरण व संवितरण अधिकारी यांनी सहायक अनुदान मंजूरीचे आदेश सशर्त किंवा बिनशर्त अनुदानाचे आहेत हे देयकावर नमूद करुन याबाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सशर्त किंवा बिनशर्त शिक्का उमटविणे आवश्यक आहे. जेणेकरुन अशी देयके पारित करताना कोषागार कार्यालयास सहायक अनुदान मंजूरीचे आदेश सशर्त किंवा बिनशर्त अनुदानाचे आहेत हे समजू शकेल.

**संदर्भांकित शासन निर्णयात नमूद केल्यानुसार ग्रामपंचायत ग्रंथालयांना ECS/DBT/NEFT द्वारे ग्रामपंचायत ग्रंथालयाचे बँक खात्यामध्ये अनुदान जमा करण्याची कार्यवाही जिल्हा ग्रंथालय अधिकारी / जिल्हा ग्रंथपाल यांनी विनाविलंब करावी.**

**आहरित केलेले अनुदान कोणत्याही परिस्थितीत ( Any How Condition ) दि.३१.०३.२०१९ पूर्वी वितरीत करण्यात यावे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी / जिल्हा ग्रंथपाल यांची राहील.**

**( किरण गं. धांडोरे )**
**ग्रंथालय संचालक**

**सहपत्र** :- निधी वितरण आदेशाचे सहपत्र.
**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१. कोषागार अधिकारी,
नांदेड/हिंगोली/चंद्रपूर/अहमदनगर/जळगाव/नंदुरबार
कोल्हापूर/पुणे/सांगली/सातारा/सोलापूर/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग.
२. अपर कोषाधिकारी, उपकोषागार कार्यालय, कोंकण भवन, नवी मुंबई.
३. कार्यासन - ५.

**प्रत :-**

१) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-५), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद/नागपूर/नाशिक/पुणे/मुंबई विभाग - यांना निदेशित करण्यात येते की, आपण विभागाचे नियंत्रक अधिकारी असल्याने, आपल्या विभागातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांना अनुदान निर्धारण व वितरण करण्याबाबत काही अडचणी उदभवल्यास त्यांना मार्गदर्शन करावे. तसेच जिल्ह्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना अनुदानाचे वितरण वेळेत झाले किंवा कसे? याबाबतचा आढावा घेऊन त्याचा अहवाल ग्रंथालय संचालनालयास सादर करावा.

**ग्रंथालय संचालनालयाचे निधी वितरण आदेश क्र.३२/निविआ/२०१८-१९/२२०९-४६,**
**दिनांक २३.०५.२०१८ सोबतचे सहपत्र.**

(रुपये हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | डी.डी.ओ.कोड | या आदेशानुसार करण्यात आलेले निधी वितरण (रु.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (५) |
| १ | नांदेड | 3401002186 | २९.०१३ |
| २ | हिंगोली | 3801002186 | २९.०१३ |
| ३ | चंद्रपूर | 4801002187 | ६९.१३९ |
| ४ | अहमदनगर | 5401002186 | ६१२.००३ |
| ५ | जळगाव | 5301002186 | २५४.७७४ |
| ६ | नंदुरबार | 5501002186 | २२२.८५९ |
| ७ | कोल्हापूर | 2601002186 | ३५.७२५ |
| ८ | पुणे | 2201002186 | २६५४.४१२ |
| ९ | सांगली | 2401002186 | २९.०१३ |
| १० | सातारा | 2301002186 | ४२३.६६५ |
| ११ | सोलापूर | 2501002186 | २८१.००० |
| १२ | ठाणे | 1201002186 | ५३.६८७ |
| १३ | रत्नागिरी | 1401002186 | ९२.४४० |
| १४ | रायगड | 1301002186 | ९२.२५२ |
| १५ | सिंधुदुर्ग | 1501002186 | १३०.६८३ |
| | | **एकूण** | **५००९.६७८** |

( किरण गं. धांडोरे )
**ग्रंथालय संचालक**